**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा.**

**आदेश क्रमांक-१६४ सन २०२४, दिनांक-२८/०६/२०२४**

पहा:- १. जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक-३२५/२०२३, दिनांक ०२/११/२०२३.

२. जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक-७५/२०२४, दिनांक ०१/०३/२०२४.

३. जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक-१०४/२०२४, दिनांक ०१/०४/२०२४.

४. सल्लागार समितीचा निर्णय दिनांक २७/०६/२०२४.

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये जिल्हा न्यायाधीश-१, मेहकर यांचे आस्थापनेवरील अधिक्षक श्री. ए.आर.नायडु हे दिनांक ३१/१०/२०२३ रोजी, संदर्भ क्रमांक ०२ अन्वये जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवरील अधिक्षक श्री. ए.आर.सुर्यवंशी हे दिनांक २९/०२/२०२४ रोजी आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मेहकर यांचे आस्थापनेवरील अधिक्षक श्री. एस.बी.धर्माधिकारी हे दिनांक ३१/०३/२०२४ रोजी शासकीय सेवेतुन नियत वयोमान प्राप्तीने सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे रिक्त पदाचे अनुषंगाने संदर्भ क्रमांक ०४ नुसार सल्लागार समितीच्या निर्णयान्वये पदोन्नती व स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव व पदनाम | नवीन नियुक्ती व स्थळ |
|---|---|---|
| ०१ | श्री. एन.व्ही.भट्टी, सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना. | जिल्हा न्यायाधीश-१, मेहकर यांचे आस्थापनेवर श्री. ए.आर.नायडु यांचे सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदी अधिक्षक म्हणुन पदोन्नतीने. |
| ०२ | श्री. एम.बी.काकडे, सहायक अधिक्षक, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मेहकर यांचे आस्थापनेवर श्री. एस.बी.धर्माधिकारी यांचे सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदी अधिक्षक म्हणुन पदोन्नतीने. |
| ०३ | श्री. एस.एच.कुळकर्णी, सहायक अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांची आस्थापना. | जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. ए.आर.सुर्यवंशी यांचे सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदी अधिक्षक म्हणुन पदोन्नतीने |

**सदरचा आदेश हा दिनांक ०२/०७/२०२४ चे मध्यान्हापुर्व पासुन अंमलात येईल.**

पदोन्नत कर्मचाऱ्याने आपले पदाचा कार्यभार दिनांक ०१/०७/२०२४ चे मध्यान्हानंतर द्यावा व आपले नुतन पदी, पदग्रहण अवधी न घेता दिनांक ०२/०७/२०२४ रोजीचे मध्याहांपूर्व रुजू व्हावे.

E:\Estt\1\Estt\NJR-2.doc

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील सहायक अधिक्षक श्री. एन.व्ही.भट्टी, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांचे आस्थापनेवरील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांचे न्यायालयातील सहायक अधिक्षक श्री. एम.बी.काकडे व मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांचे आस्थापनेवरील सहायक अधिक्षक श्री. एस.एच.कुळकर्णी यांची पदे पुढील आदेशापावेतो रिक्त ठेवण्यात येत असुन श्री. एन.व्ही.भट्टी यांचे पदाचे काम श्री. बी.जे.करांडे यांचेकडुन, श्री.एम.बी.काकडे यांचे पदाचे काम दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मलकापुर यांचे आस्थापनेवरील सहायक अधिक्षक श्री. आर.बी.परतेती यांचेकडुन तसेच श्री. एस.एच.कुळकर्णी यांचे पदाचे काम श्री. व्ही.ए.तिडके, वरिष्ठ लिपीक यांचेकडुन करुन घेण्यात यावे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १३/२०२४, दिनांक ०८/०१/२०२४ अन्वये श्री. एस.जी.जाधव, अधिक्षक यांचे प्रतिनियुक्तीच्या कालावधीमध्ये त्यांचे पदाचे काम दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील सहायक अधिक्षक श्री. एन.व्ही.भट्टी यांचेकडे ठेवण्यात आले होते. परंतु श्री. एन.व्ही.भट्टी, सहायक अधिक्षक यांची अधिक्षक या पदी पदोन्नती झाल्याने त्यांचेकडे ठेवण्यात आलेला श्री. एस.जी.जाधव यांचे अधिक्षक या पदाचा कार्यभार आता या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत असुन श्री. एस.जी.जाधव, अधिक्षक यांचे प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्यांचे पदाचा कार्यभार आता या आदेशाद्वारे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, खामगांव यांचे न्यायालयातील सहायक अधिक्षक श्री. एस.ए.जोशी यांचेकडे पुढील आदेशापावेतो ठेवण्यात येत आहे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १४९/२०२३, दिनांक ०६/०५/२०२३ अन्वये सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांचे आस्थापनेवरील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांचे न्यायालयातील सहायक अधिक्षक श्री. एम.बी.काकडे यांची जिल्हा न्यायाधीश-१, मलकापुर यांचे आस्थापनेवर करण्यात आलेली प्रतिनियुक्ती आता या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत असुन त्यांनी त्यांचे पुर्वीचे पदी दिनांक ०१/०७/२०२४ रोजीचे मध्यान्हांपुर्वी रुजू व्हावे.

तसेच जिल्हा न्यायाधीश-१, मलकापुर यांचे आस्थापनेवरील अधिक्षक श्री. एम.डी.जोशी यांची जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलडाणा यांचे आस्थापनेवर प्रतिनियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे त्यांचे पदाचे काम श्री. एम.बी.काकडे, सहायक अधिक्षक यांचेकडे ठेवण्यात आले होते परंतु त्यांची पदोन्नती झालेली असल्यामुळे जिल्हा न्यायाधीश-१, मलकापुर यांचे आस्थापनेवरील अधिक्षकाचे काम त्यांचेच

आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर असलेल्या सहायक अधिक्षक श्रीमती आर.जी.कोल्हे यांचेकडुन पुढील आदेशापावेतो करुन घेण्यात यावे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ७५/२०२४, दिनांक ०१/०३/२०२४ अन्वये जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवरील श्री. ए.आर.सुर्यवंशी, अधिक्षक (कार्यव्यवस्थापन विभाग) हे दिनांक २९/०२/२०२४ रोजीचे मध्यान्हानंतर पासुन शासकीय सेवेतुन नियत वयोमान प्राप्तीने सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचे पदाचा श्री. एस.व्ही.कुळकर्णी, सहायक अधिक्षक (जिल्हा नाझर) यांचेकडे ठेवण्यात आलेला कार्यभार आता या आदेशाद्वारे दिनांक ०१/०७/२०२४ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासुन रद्द करण्यात येत आहे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १५९/२०२४, दिनांक १९/०६/२०२४ अन्वये सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मेहकर यांचे आस्थापनेवरील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मेहकर यांचे न्यायालयातील सहायक अधिक्षक श्री. व्ही.एस.आंबेकर यांची जिल्हा न्यायाधीश-१, मेहकर यांचे आस्थापनेवर करण्यात आलेली प्रतिनियुक्ती आता या आदेशाद्वारे दिनांक ०१/०७/२०२४ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासुन रद्द करण्यात येत आहे.

पदोन्नत कर्मचारी यांना सुचीत करण्यात येते की, ते विकल्प देण्यास पात्र असतील तर, त्यांनी आपले पदोन्नत पदाचा कार्यभार घेतल्याच्या दिनांकापासुन एक महिन्याचे आत आपला विकल्प सादर करावा वेळेत न आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही.

उपरोक्त कर्मचाऱ्यांचा पदभार जिल्हा न्यायालयाच्या पुर्वपरवानगी शिवाय बदलण्यात येवू नये.

पदोन्नत कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले पदाचा सविस्तर कार्यभार पिठासीन अधिकारी यांचे मार्फत जिल्हा न्यायालयास सादर करावा.

Digitally signed by SWAPNIL CHANDRAKANT KHATI
Date: 2024.06.28 13:27:32 +0530

(स्वप्नील चं. खटी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

E:\Estt\1\Estt\NJR-2.doc

पृष्ठांकन क्रमांक/आस्था./२५९३/२०२४, दिनांक-२८/०६/२०२४.
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

१. जिल्हा न्यायाधीश-१, मलकापुर / मेहकर.

२. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव / मलकापुर / मेहकर.

३. मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा.

४. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर / मेहकर.

५. अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

६. वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

७. संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

८. अध्यक्ष, बुलडाणा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था म. खामगांव.

९. कार्यालय प्रत.